# फॉर्म भरताना दक्षता घ्या

**ॲडमिशन अपडेट**

**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील अभियांत्रिकी, वैद्यकीयसह अनेक शाखांमधील प्रवेशासाठीचे अर्ज डिसेंबर १७ पासून उपलब्ध होत आहेत. 'जेईई मेन २०१७' परीक्षेचे अर्ज २ जानेवारी २०१७ पर्यंत उपलब्ध आहेत. देशभरात 'जेईई'साठी सुमारे १४ लाख; तर 'नीट'साठी ८ लाख विद्यार्थी अर्ज भरतील. ऑनलाइन अर्ज फक्त एकदाच भरता येत असल्यामुळे फॉर्म भरताना दक्षता घ्या.**

**अर्ज भरण्यापूर्वी :** परीक्षा कोणत्या पद्धतीने (ऑफलाइन-ऑनलाइन) द्यायची, हे निश्चित करा. परीक्षा कोणत्या कोर्ससाठी देणार, परीक्षा केंद्राची निवड तसेच शुल्क कोणत्या पद्धतीने (डेबिट, क्रेडिट, नेटबँकिंग, मोबाईल वॉलेट) हे निश्चित करा.

**वैयक्तिक माहिती :** स्वत:चा चालू स्थितीतील ई-आयडी, मोबाईल क्रमांक (सप्टेंबर २०१७ पर्यंत न बदलणारा), जातीचा प्रवर्ग, आधार कार्ड क्रमांक, दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, पिन कोडसह संपूर्ण पत्ता, वार्षिक उत्पन्न वगैरे माहिती संकलित करावी.

**ऑनलाइन अर्ज भरताना :** ड्रॉपडाऊन मेनूमधून योग्य तो पर्याय निवडावा. संगणकावर येणाऱ्या सूचनांचे पालन करावे. माहिती सबमीट करीत पुढे जावे. अर्ज पूर्ण भरल्यानंतर तो तपासावा, नंतरच सबमीट करावा. फॉर्म जनरेशनसाठी सॉफ्टवेअरला थोडा वेळ लागू शकतो. त्यामुळे सबमीटनंतर थांबा आणि वाट पहा. उगीचच कोठे क्लिक करू नका.

– हेमचंद्र शिंदे, बारामती

**अर्ज भरण्यापूर्वी :** प्रथम संकेतस्थळावरील माहितीपत्रक डाऊनलोड करून त्याचा अभ्यास करा. बहुतेक सर्वच परीक्षांचे अर्ज ऑनलाइन आहेत. त्यामुळे अर्ज सबमीट केल्यानंतर भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून बोर्डाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. फोटो, स्वाक्षरी व सूचनेनुसार त्याच बोटाचा ठसा यांचे स्कॅनिंग करून अर्ज भरताना अपलोड करावेत. रजिस्ट्रेशन, परीक्षा शुल्क भरणे व ऑनलाइन अर्ज सबमीट केल्यावर त्याची प्रिंट व चलनाची प्रिंट जपून ठेवावी.

**अत्यंत महत्त्वाचे :** चलनाद्वारे शुल्क भरताना संकेतस्थळावरून ई-चलनाची प्रिंट घ्यावी. त्यानंतर सुमारे २४ तासानंतरच बँकेत शुल्क भरावे. शुल्क भरल्यानंतर पुन्हा २४ तासानंतर संकेतस्थळावर जाऊन अर्जाची प्रिंट घ्यावी. या उलट क्रेडिट कार्ड, डेबिट कार्डद्वारे शुल्क भरल्यास शुल्क त्याक्षणी संबंधित यंत्रणेस प्राप्त होते व अर्ज भरण्याची प्रक्रियाही लगेच पूर्ण होते. क्रेडिट कार्ड घरात नसले, तरीही एटीएमकम डेबिट कार्ड वापरता येते. सध्या नोटाबंदीमुळे मोठ्या रांगा बँकेत आहेत. त्यामुळे हाच पर्याय योग्य राहील.

शब्दांकन : **ज्ञानेश्वर रायते**, बारामती